महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण

जनसंपर्क विभाग

कक्ष क्र. १९/२० तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे पूर्व, मुंबई – ४०००५१.

दू.क्र. ०२२-६६४०५०६६/७७. ईमेल : cpromhadaoffice@gmail.com


======================================================================

जावक क्रमांक – ८०६/ ८२ दिनांक :- २० जून, २०२५

प्रसिद्धिपत्रक

# मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळातर्फे २६ जून रोजी जनता दरबार दिनाचे आयोजन

मुंबई, दि. २० जून, २०२५ :- नागरिकांच्या तक्रारींची न्याय व तत्परतेने शासकीय यंत्रणेकडून सोडवणूक करण्यासाठी एक प्रभावी उपाययोजना म्हणून म्हाडा मुख्यालयात राबविण्यात येणाऱ्या लोकशाही दिनाप्रमाणे म्हाडाच्या मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळ स्तरावर जनता दरबार दिनाचे आयोजन गुरुवार दि. २६ जून, २०२५ रोजी दुपारी ११.०० ते ०१.०० दरम्यान आयोजन करण्यात येणार आहे.

नागरिकांचे दैनंदिन जीवन सुखकर करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या प्रशासनिक विभागांकरिता मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी दिलेल्या निर्देशानुसार व राज्याचे उपमुख्यमंत्री तथा गृहनिर्माण मंत्री श्री. एकनाथ शिंदे यांनी "नागरिकांच्या तक्रारींचे निवारण" होण्याकरिता जनता दिन आयोजित करण्याबाबत दिलेल्या सूचनेनुसार , म्हाडाच्या मुंबईतील व राज्यातील प्रत्येक विभगीय मंडळांनी जनता दिन उपक्रमाचे आयोजन करण्याचे निर्देश 'म्हाडा'चे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजीव जयस्वाल यांनी दिले आहेत. या निर्देशानुसार व त्यांच्या मार्गदर्शनाखाली मंडळाच्या अखत्यारीतील मुंबई शहरातील उपकरप्राप्त इमारती व मुंबई शहर, उपनगरातील संक्रमण शिबिरातील इमारती, गाळयांमधील नागरिकांचे प्रश्न तत्परतेने सोडविण्यासाठी जनता दरबार दिनाचे आयोजन करण्यात आले आहे.

मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळाचे मुख्य अधिकारी श्री. मिलिंद शंभरकर यांच्या अध्यक्षतेखाली वांद्रे पूर्व येथील म्हाडा मुख्यालयातील तिसर्या मजल्यावरील भारतरत्न गुलजारीलाल नंदा सभागृहात या जनता दरबार दिनाचे आयोजन करण्यात आले आहे. मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळाच्या अखत्यारीतील मुंबई शहरातील उपकरप्राप्त इमारती व मुंबई शहर, उपनगरातील संक्रमण शिबिरातील इमारती, गाळयांमधील नागरिकांनी या जनता दरबार दिनात आपल्या निवेदन, अर्ज व कागदपत्रांसाह उपस्थित राहून आपले प्रश्न, समस्या मांडाव्यात, असे आवाहन मंडळातर्फे करण्यात येत आहे.

###

(वैशाली गडपाले)

मुख्य जनसंपर्क अधिकारी / म्हाडा

---

सोशल मिडियावर आम्हाला फॉलो करा :

@mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial

**Maharashtra Housing & Area Development Authority**
Public Relations Department
Room No. 19/20, Ground Floor, Gruhnirman Bhavan, Kala Nagar, Bandra East,
Mumbai-400051. Email : cpromhadaoffice@gmail.com

==================================================

Outward No. : 806/82 Dt. June 20, 2025

**Press Release**

# Mumbai Building Repairs and Reconstruction Board to Organize Janata Darbar on June 26

Mumbai, June 20, 2025: In line with MHADA's commitment to addressing citizens' concerns swiftly and transparently through structured platforms—similar to the Lokshahi Din conducted at MHADA Headquarters—the Mumbai Building Repairs and Reconstruction Board (MBRRB) will organize a Janata Darbar on Thursday, June 26, 2025, at 11:00 a.m.

This initiative is being organized in line with the directives of Hon'ble Chief Minister Shri Devendra Fadnavis and Hon'ble Deputy Chief Minister and Housing Minister Shri Eknath Shinde, aimed at enhancing the quality of citizens' daily lives by facilitating prompt redressal of public grievances through Janata Din sessions across all administrative departments of the Government of Maharashtra. To support this goal Mr. Sanjeev Jaiswal (I.A.S.), Vice President and CEO of MHADA, has instructed the chief officers of all the regional boards to organize Janata Darbars. In line with these directives, the MBRRB is holding this public interaction session.

The primary aim of the Janata Darbar is to provide direct forum for citizens to voice their grievances and to seek quick and effective solutions in a time-bound and accountable manner to the concerns of residents living in cessed buildings and transit camp tenements within Mumbai city and its suburbs—areas that fall under the jurisdiction of the Board.

The Janata Darbar will be held under the chairmanship of Mr. Milind Shambharkar (IAS), Chief Officer of the MBRRB, at the Bharat Ratna Gulzarilal Nanda Hall, located on the third floor of MHADA Headquarters, Bandra East.

Citizens residing in the above-mentioned areas are encouraged to attend and present their issues in person. They are requested to bring relevant applications, documents, and representations to help ensure efficient redressal of their concerns.

###

(Vaishali Gadpale)
Chief Public Relations Officer, MHADA

---

Follow us on :

@mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial